महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १७५ वा | दिनांक : १५/०४/२०२५ | वार : सोमवार

## आरएसएसचा सरसंघचालक दलित, मुस्लीम कधी करणार?

**मुंबई :** संविधानाचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यातील सलोख्याचे संबंध जगजाहीर आहेत. नेहरूंनी बाबासाहेबांना सन्मानाने देशाच्या पहिल्या कायदा मंत्रिपदाची जबाबदारी दिली. आज काँग्रेस पक्षाचा अध्यक्षही दलित समाजाचा आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सरसंघचालक दलित, मुस्लीम किंवा महिला कधी करणार? असा थेट सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेस पक्षाबद्दल केलेल्या अशोभनीय वक्तव्याचा खरपूस समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मोदींनी काँग्रेस पक्षाबद्दल केलेले वक्तव्य अत्यंत हास्यास्पद आहे, या विधानाचा मी जाहीर निषेध करतो. काँग्रेस पक्षाने देशासाठी दिलेले योगदान अधोरेखीत झालेले आहे. काँग्रेसला जाज्वल्य इतिहास आहे, हे मोदीच काय कोणीही नाकारू शकत नाही. काँग्रेस सरकारच्या काळात साक्षरतेपासून अंतराळापर्यंत प्रगती केलेली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, नरेंद्र मोदी हे ११ वर्षापासून सत्तेत आहेत, या ११ वर्षात त्यांनी देशाचे काय भले केले, हे त्यांनी जाहीर करावे. नरेंद्र मोदी यांनी हिंदू-मुस्लीम, दलित-सवर्ण-ओबीसी यांच्यात द्वेष निर्माण करण्याचेच काम केले आहे. तीन तलाक, वक्फ बोर्ड सारखे मुद्दे उपस्थित करून मोदीजींनी मुस्लीम महिलांबद्दलची आपली खोटी तळमळ दाखवण्याचा प्रयत्न केला पण मोदींनी गेल्या ११ वर्षात एकाही मुस्लीम महिलेला आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री किंवा केंद्रीय मंत्री केले नाही. मोदींनी गेल्या ११ वर्षात एकही मुस्लीम उमेदवार दिला नाही. मोदी सरकारच्या कार्यकाळात मुस्लीम आणि दलितांवर अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यांचे लिंचिंग केले जात आहे ते रोखण्यासाठी मोदींनी काहीही केले नाही त्यामुळे त्यांच्या कोरड्या भाषणबाजीला काही अर्थ नाही.

देशात शेतकऱ्यांचा शेतमालाला भाव मिळत नाही, तरुणांना रोजगार मिळत नाही, देशातील बहुजन समाज अस्वस्थ आहे. या मुद्द्यांकडे त्यांनी लक्ष दिले पाहिजे. पण मोदी मात्र स्वतःची आरती करून घेत आहेत. कोरोना काळात टाळी, थाळी वाजवायला लावली. आता अमेरिकेच्या टेरिफवर काय भूमिका आहे ते स्पष्ट करावे. देशातील गरिबांची संख्या मोदींच्या काळात वाढत आहे. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत, लाखोंच्या संख्येने लोक देश सोडून चालले आहेत, हेच मोदींनी देशाचे भले केले आहे का? भाजप सरकारमध्ये दलित अत्याचार वाढले आहेत, मॉब लिंचिंग सारखे प्रकार दलितांबाबत झाले आहेत, ते थांबावे यासाठी मोदींनी काहीही प्रयत्न केले नाहीत. सातत्याने काँग्रेसवर टीका करणे हेच त्यांचे काम राहिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना किती प्रेम आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही, याच विचाराच्या लोकांनी बाबासाहेबांचा सातत्याने अपमान केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पहिल्यापासूनच मानत नाही. रामलीला मैदानावर बाबासाहेबांचे संविधान कोणी जाळले, हे मोदींना माहित नाही का? परंतु खोटा इतिहास सांगून दिशाभूल करणे ही संघाची शिकवण आहे, तेच मोदी करत आहेत. पण त्यांच्या अशा विधानाने खरा इतिहास झाकला जाणार नाही व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजप व मोदींनी केलेली पापं धूवून निघणार नाहीत. प्रत्येक जाती धर्माच्या व्यक्तीवर प्रेम असले पाहिजे हे संविधान सांगते, सर्वांना सोबत घेऊन जाणे ही भारताची परंपरा आहे, 'आता विश्वात्मके देवे', हे ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचे तत्वज्ञान आहे, तेच तत्वज्ञान काँग्रेसचे आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

## पंतप्रधानांना पुण्यातून एक लाख पोस्टकार्ड पाठवणार



**पुणे :** महार रेजिमेंटच्या मुख्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसवण्यात यावा या प्रमुख मागणी साठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे लक्ष वेधण्यासाठी रिपब्लिकन युवा मोर्चा व महार रेजिमेंटच्या निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या यशसिद्धी वेल्फेअर असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरामध्ये प्रधानमंत्री कार्यालयाला पोस्ट कार्ड पाठवण्याच्या अभियाना ची सुरुवात करण्यात आली.

सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या या अभियानात दुपारी तीन वाजेपर्यंत सुमारे पंधरा हजार नागरिकांनी सहभाग दर्शवला. अंदाजे एक लाख पोस्टकार्ड पुणे शहरातून पाठवण्याचा मनोदय यावेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला. यावेळी रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे व महार रेजिमेंटचे निवृत्त सैनिक कॅप्टन भगवान इंगोले, नायक सुरेश वानखडे, नायक धनराज गडबडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

पोस्ट कार्ड पाठवण्याच्या मोहिमेमध्ये आंबेडकरी चळवतील ज्येष्ठ नेते वसंत साळवे, आरपीआय आठवले गटाचे प्रादेश संघटक परशुराम वाडेकर, ॲड. मोहन वाडेकर, भारत मुक्ती मोर्चाचे सचिन बनसोडे, रिपब्लिकन जनशक्तीचे शैलेंद्र मोरे, दलित पँथर ऑफ इंडियाचे बापूसाहेब भोसले, रिपब्लिकन सेनेचे युवराज बनसोडे, रिपब्लिकन युवा मोर्चाच्या सुवर्णा डंबाळे, रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे विवेक बनसोडे, भिम सेवा प्रतिष्ठानचे राम डंबाळे, सिद्धांत सुर्वे, निखिल बहुले इत्यादी सहभागी झाले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन प्रतीक डंबाळे, राहुल नागटिळक यांनी केले यावेळी महार रेजिमेंटच्या मुख्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा बसवण्यासाठी राज्यभरातून किमान दहा लाख पोस्ट कार्ड पाठवण्याचा मानस असल्याचे राहुल डंबाळे यांनी सांगितले.

## मुंबई भाजपा अध्यक्षपदासाठी नव्या चेहऱ्याला मिळणार संधी

**मुंबई :** महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थान्च्या निवडणुकीची सर्व पक्षांकडून तयारी केली जात आहे. मुंबई महानगरपालिकेवर विशेष लक्ष भाजप तसेच शिवसेनेकडून देण्यात येणार आहे. या अनुषंगाने भाजपने नवीन रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार मुंबई अध्यक्षपदासाठी नव्या चेहऱ्याला संधी दिली जाणार असल्याचे बोलले जात आहे. मुंबईतील सर्व आमदारांची वरिष्ठ पदाधिकऱ्यांसह बैठक सुरू असून सर्व जिल्हाध्यक्ष या बैठकीला हजेरी लावत आहेत.

सध्या मुंबईच्या अध्यक्षपदावर राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार आहेत. मात्र, आता मुंबई महापालिका निवडणूक लक्षात घेता मुंबईच्या अध्यक्षपदावर आता नवीन चेहऱ्याला संधी देण्याचा विचार केला जात आहे. यात आमदार प्रवीण दरेकर तसेच अमित साटम यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. त्यात प्रवीण दरेकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची देखील चर्चा रंगली आहे.

प्रवीण दरेकर हे भाजपचे आमदार तसेच विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेतेही राहिले आहेत. प्रवीण दरेकर हे भाजपचे राज्य सचिव आणि भाजपच्या सहकार विभागाचे प्रमुखही आहेत. सर्वप्रथम २००९ मध्ये मुंबईच्या मागाठाणे मतदारसंघातून मनसेच्या तिकिटावर प्रवीण दरेकर निवडून आले होते. २०१५ साली त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

अमित साटम हे भाजप आमदार असून त्यांनी अंधेरी पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. अमित साटम यांनी काँग्रेसचे अशोक भाऊ यांचा १९५९९ मतांनी पराभव केला होता. तसेच गेल्या १० वर्षांपासून अमित साटम हे येथील मतदारसंघातील आमदार आहेत. त्यामुळे प्रवीण दरेकर व अमित साटम यांच्या नावात मुंबई अध्यक्षपदासाठी चर्चा सुरू आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ एप्रिल २०२५


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**कन्नड (प्रकाश खेत्री) :** भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल रोजी १३४ वी जयंती स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालय, दाभाडी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी ग्रामपंचायत सरपंच अकिलाबाई मुख्तार शहा, उपसरपंच सौ. पुष्पाबाई मधुकर आदिक यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मुख्तार शहा, श्री. मधुकर आदिक, शिक्षिका श्रीमती जाधव मॅडम तसेच गावातील सामाजिक कार्यकर्ते श्री. बाबुराव आदिक, श्री.मच्छिंद्र आदिक,श्री. बाबासाहेब आदिक, श्री. सदाशिव लोखंडे, श्री.भास्कर मिस्तरी,श्री. अरुण आदिक, श्री. काकासाहेब सुलताने, श्री. मच्छिंद्र आदमाने आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यात आला. वाचनालयातर्फे आयोजित या सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि संविधान निर्मितीतील योगदानावर प्रकाश टाकला. याप्रसंगी गावकऱ्यांनी सामूहिकरित्या एकत्र येऊन बाबासाहेबांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे आयोजन स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालय, दाभाडी येथिल समितीच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाचनालयातील कार्यकर्त्यांनी तसेच गावातील नागरिकांनी परिश्रम घेतले.

## जे.इ.एस. महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** येथील जेईएस महाविद्यालय जालना, येथे महामानव ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून, वंदन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, प्रा. डॉ. आनंद कुलकर्णी, मराठी विभाग प्रमुख डॉ.यशवंत सोनूने, डॉ. स्वप्नील सारडा, प्रा. विजय शिंदे, प्रा.वाल्मीक जाधव,कार्यालयीन अधीक्षक श्री.बाबाजी साळुंखे. श्री राजेंद्र ठोंबरे, श्री महेश लोंकलकर, श्री प्रकाश भोपळे, श्री.अजय कुलकर्णी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाड्मय पुरस्कार



**जालना :** येथील कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या राजकारण घुसलं घरात या दोन अंकी ग्रामीण नाटकास मातंग साहित्य परिषद पुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ धनंजय भिसे कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश जी प्रभूणे, राज्यसभेचे सदस्य डॉ.विनयजी सहस्त्रबुद्धे यांच्या शुभहस्ते दुर्गेश प्रभाकर शेळके यांनी हा साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय वाड्मय पुरस्कार स्विकारला या पुरस्कार प्रसंगी महाराष्ट्रांतील साहित्यिक अंबादास सगट,डॉ.कैलास दौंड, जयराज नळे, श्रीनिवास म्हस्के, सुभाष खिल्लारे,शरद गायकवाड या मान्यवरांनी हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित होते.या पुरस्कार मिळाल्याबद्दल समाजसेवक रमेश जी देहडकर कवी कैलास भाले,प्रा.पंढरीनाथ सारके, मनीष पाटील, डॉ.सुहास सदावर्ते, बंडू काळे, सुनीता शेळके,रामदास भारूडकर, सुखदेव सपकाळ, अनिरुद्ध पावसे,किशोर राऊत, अरुण काफरे,शेख बाशन, विठ्ठलराव ठेपले इ.अभिनंदन केले.

## सुरेश डोळस, विनोद साळुंखे यांनी बॅडमिंटन स्पर्धा जिंकली




**कन्नड :** विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड तालुका येथे महावीर जयंतीनिमित्त जन्मोत्सव निमित्त तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा घेण्यात आल्या यावेळी तालुक्यातील 20 जणांनी सहभाग घेतला या स्पर्धेमध्ये उपविजेतेपद अविनाश गायकवाड डॉ कैलास मोती यांना उपविजेतेपद वर समाधान मानावे लागले यावेळी बक्षीस वितरण प्रसंगी वासडी गावचे माजी सरपंच राहुल पाटणी प्रकाशचंद पाटणी पुनम पाटणी मयूर पाटीलयांच्या संकल्पनेतून या स्पर्धा घेण्यात आल्या यावेळी प्रमुख पाहुणे म्हणू न कन्नड तालुका क्रीडा संकुल समितीचे सदस्य व मार्गदर्शक प्रवीण शिंदे यावेळी एमआरएफ डीलरशिपचे संदीप शिंदे यावेळी पशुधन अधिकारी डॉ विजय इटोले आदींची प्रमुख उपस्थिती होती याप्रसंगी खेळाडूंना प्रोत्साहन पर वासडी येथील जैन समाजाच्या अल्पोपहार देण्यात आला आणि विजेता संघांना स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले या स्पर्धा आयोजनासाठी धवल पाटणी मयूर पाटणी ए जा ज शहा विशाल दांडेकर आदींनी परिश्रम घेतले


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ एप्रिल २०२५

# 'रन फॉर मिलिंद' साठी रस्त्यावर धावले हजारो स्पर्धक




**छत्रपती संभाजीनगर :** बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स् एज्युकेशन सोसायटी मुंबईच्या छत्रपती संभाजीनगर नगर येथील मिलिंद महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मिलिंद कला महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या 'मिलिंद मॅरेथॉन २०२५' मध्ये 'रन फॉर मिलिंद' साठी रस्त्यावर हजारो स्पर्धक धावले.आज रविवार, दि. १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६.०० वाजता मिलिंद कला महाविद्यालयाच्या प्रांगणातून मिलिंद मॅरेथॉन २०२५ 'रन फॉर मिलिंद' हे ब्रिद वाक्य घेऊन मिलिंद मॅरेथॉनची सुरुवात भिक्खुसंघानी बुध्दवंदना घेऊन केली. मिलिंद मॅरेथॉन मधील पहिल्या ७ कि.मी. च्या स्पर्धेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रोफेसर डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आली. यावेळी भिक्खुसंघ उपस्थित होता. तसेच ३ कि.मी. व ५ कि.मी. स्पर्धेची सुरुवात मॅरेथॉनच्या मुख्य संयोजक व मिलिंद कला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान, मा. श्रीमती सुमनताई प्रधान व मा. पुरुषोत्तम ठाकुर यांच्या हस्ते ध्वज दाखवून करण्यात आली. या मॅरेथॉनमध्ये ७ कि.मी. रनमध्ये पुरुष गटात प्रथम क्रमांक रोहित बिन्नर याने रु.१०,०००/- रोख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेला २४ कॅरेट सोन्याचा टि-शर्ट तसेच चषक पटकाविले, द्वितीय क्रमांक कमलाकर देशमुख तर तृतीय क्रमांक रामेश्वर गुंजाळ याने मिळविला. ७ कि.मी. महिला गटात मिताली भोयर हिने प्रथम क्रमांकाचे रु.१०,०००/- रोख व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेला २४ कॅरेट सोन्याचा टि-शर्ट तसेच चषक पटकाविले, द्वितीय क्रमांक प्रियंका ओक्सा, तर तृतीय क्रमांक अमृता गायकवाड हिने मिळविला.५ कि.मी. पुरुष गटात जयेश पाटील प्रथम क्रमांक मिळविला, द्वितीय क्रमांक गोविंद पाडेकर याने तर तृतीय क्रमांक किशोर मरगळ याने मिळविला. ५ कि.मी. महिला गटात मनिषा पाडवी प्रथम क्रमांक मिळविला, द्वितीय क्रमांक अंजली पंडित हिने तर तृतीय क्रमांक परिमला बाबर हिने मिळविला.३ कि.मी. पुरुष गटात अंकित जंगले याने प्रथम क्रमांक मिळविला, द्वितीय क्रमांक अर्जुन राठोड याने तर तृतीय क्रमांक संतोष राऊत याने मिळविला. ३ कि.मी. महिला गटात वर्षा कदम हिने प्रथम क्रमांक मिळविला, द्वितीय क्रमांक अर्चना जाधव हिने तर तृतीय क्रमांक जयश्री नरोडे हिने मिळविला, या मॅरेथॉनचा समारोप 'रन फॉर फन' ने करण्यात आला.या मॅरेथॉनचे पारितोषिक वितरण मुख्य संयोजक प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान, छत्रपती संभाजीनगर, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव डॉ. फुलचंद सलामपुरे वै क्रीडा संचालक मा.डॉ. दयानंद कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. मॅरेथॉनसाठीची सर्व रोख पारितोषिके प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांनी प्राचार्य एस.टी. प्रधान फाऊंडेशन यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिली.मिलिंद मॅरेथॉन मधील सहभागी स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी झुंबा डान्सचे ही आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी व स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठया संख्येने विद्यार्थी, खेळाडू व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड यांची देवगिरी किल्ल्यास भेट



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड यांनी दि १२ शनिवारी देवगिरी किल्यातील जळीत प्रकरणाची माहिती घेऊन आढावा बैठक घेतली.यावेळी पुरातत्त्व अधिक्षण शिवकुमार भगत,सहायक अभियंता हेमंतकुमार हुकरे व सहायक सरंक्षक संजय रोहनकर यांच्या कडून आग कश्यामुळे व कशी लागली याबाबत जाणून घेतले. यावेळी संजय खम्बायते,ऍड अशोक मुळे,सरपंच शबाना शेख, उपसरपंच जावेद शेख, माजी सरपंच संजय कांजूने,रामदास इंगळे,पवन गायकवाड,संदीप शेळके,तलाठी सूरज गिरी,ग्रामपंचायत सदस्य सैय्यद मतीन,किशोर जाधव,दीपक घुसळे,सैय्यद शेरू,इस्माईल पठाण,लाला शेख,कल्याण काजूने,रोहित शेळके व ग्रामस्थ यांना बैठकीत बोलवून घेत वेळोवेळी लागणारी आग याच्यावर उपाययोजना याबाबत चर्चा करण्यात आली यावर गावकऱ्यांनी सांगितले की दौलताबाद किल्ला हा जागतिक वारसा असून हा जिवंत राहिले पाहिजे किल्ल्यावर जाणाऱ्या पर्यटकांना तपासणी करून प्रवेश देणे, तटबंदीचे व परिसरातील गवत योग्य वेळी काढून घेतले पाहिजे,पर्यटकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे ,सुरक्षा रक्षक, व कर्मचारी वर्ग यांच्यात वाढ करण्यात यावी,स्थानिक रोजगार उपलब्ध करून देण्यात यावी,पर्यटक वाढीसाठी प्रयत्न करण्यात यावे अशा उपाय योजना गावकर्यांकडून डॉ कराड यांनी जाणून घेतल्या सुरक्षेच्या दृष्टीने किल्ल्याच्या संवर्धनासाठी व सुरक्षित स्मारक राहवे यासाठी जेवढे निधी पाहिजे तेवढा केंद्र सरकारकडून उपलब्ध करून देण्यात येईल, लवकर पुरातत्व विभाग, ग्रामपंचायत, महसूल विभाग, अग्निशमन विभाग यंची बैठक घेऊन यावर उपाय योजना करण्यात येणार आहे त्यासाठी इतिहास अभयासक, गावकरी, त्या त्या विभागाचे अधिकारी यांची एक समिती स्थापन करण्यात येणार आहे व लवकरच भारतमाता मंदिर येथे साऊंड अँड लाईट शो सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दौलताबाद परिसरातील नवीन पर्यटन स्थळ व धार्मिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक स्थळंची माहिती घेऊन तिचा दस्तऐवज करावा व आम्हाला द्यावा अशी सूचना मिटमिटा येथिल इतिहास अभ्यासक तथा संशोधक प्रा.शिवाजी गायकवाड यांना केली.

याचबरोबर केंद्रीय मंत्री किरण रिजुजी यांनी दौलताबाद किल्ल्या समोर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व राजवाडा येथील बुद्ध विहार साठी निधी उपलब्ध करून दिले जाणार आहेत त्या जागेची पाहणी आज डॉ कराड यांनी केली. यावेळी त्यांचा दौलताबाद गावकर्यांच्या वतीने शाल पुस्पहार देऊन स्वागत करण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ एप्रिल २०२५


## शिक्षणातून प्रगल्भ जाणिवेचा विद्यार्थी निर्माण व्हावा - डॉ. संजय गायकवाड




**कन्नड (अरूण थोरात):** शिक्षणातून तर्कशक्ति व विचारशक्तीचा विकास करणे हे शिक्षणाचे महत्वाची उद्दिष्ट आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्या प्रमाणे शिक्षणाने माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत केवळ शून्य आहे. त्यामुळे शिक्षणातून चारित्र्यसंपन्न व प्रगल्भ जाणिवेचा विद्यार्थी तयार व्हावा अशी अपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने आयोजित "डॉ. बाबासाहेब आंबेडकर: शिक्षण विश्वातील प्रेरणास्त्रोत" या विषयावर आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून व्यक्त केली.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक प्रवास त्यांनी सर्वस्पर्शी स्वरूपात मांडला व हा प्रवास आपल्या स्मरणात ठेवून आपल्या जीवनाला आकार द्यावा असे आवाहनही याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक प्रवास हा प्रवास नसून संघर्षाचा इतिहास आहे. त्यांच्या संघर्षामुळेच आपल्या जीवनात प्रकाश पोहोचू शकला म्हणून विद्यार्थ्यांनी या महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सातत्याने ज्ञानसाधनेमध्ये आपला वेळ सदुपयोगी लावावा अशी अपेक्षा कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. व्हि. एन. भोसले यांनी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचारामुळेच जात, धर्म, लिंगभेद कमी झाल्यामुळे व स्त्रियांना अधिकार प्राप्त झाल्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होत. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक समतेची दूरदृष्टी आपणास लक्षात येते याची जाणीव आपण सर्वांनी ठेवली पाहिजे,असे ते या प्रसंगी म्हणाले. शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागा व द फोरम ऑफ पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन: प्रोफेसर्स, ऍडमिस्ट्रेशन ऑफिसर्स अँड स्कॉलर्स, नांदेडच्या वतीने भारतीय संविधान या विषयावर सामान्य ज्ञान स्पर्धेत गुणाानुक्रमे ओमकार चांदिले (प्रथम), टाकिया मेहराज मोहम्मद रफीक (द्वितीय) पठाण बुसरा मुजीब (तृतीय), यश बबन दणके ( उत्तेजनार्थ) आलेल्या विद्यार्थ्यांना भारताचे संविधान मान्यवरांच्या हस्ते भेट देण्यात आले. याप्रसंगी शिक्षण क्षेत्रातील संपादन की बद्दल डॉ. संजय गायकवाड यांचा प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, दत्ता मोरसकर, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय भालेराव यांनी केले तर डॉ. अतिश म्हेत्रे यांनी आभार व्यक्त केले.

## श्री. हनुमान मंदिरात बापूराव पाटील यांच्या हस्ते महाआरती संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** :श्री हनुमान जन्मोत्सव निमित्त मुरूम शहरातील श्री हनुमान मंदिरात सायंकाळी जिल्हा बँकेचे चेअरमन बापूराव पाटील यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाला. मंदिर समितीच्या वतीने पाटील यांचा येतोचित्त सत्कार करण्यात आला. यावेळी व्यंकट जाधव,डॉ.राधाकृष्ण डागा, ऍड उदय वैद्य, शिवशंकर ब्याळे, अशोक मिणियार,गोविंद पाटील,दामोदर काबरा,श्रीकांत बेंडकाळे, राजू भोसगे, आकाश भोसगे, मल्लिनाथ भोसगे, श्रीराम कुलकर्णी, सिद्राम बालकुंदे, गोबिंद कौलकर, रणजित राजपूत, मल्लिकार्जुन बदोले, कलय्या स्वामी, चंद्रकांत कुलकर्णी आदीसह श्री हनुमान भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी श्री हनुमान मंदिरास श्रीराम कुलकर्णी यांच्या पुढाकाराने क्रेनच्या साह्याने फुलांनी सजविण्यात आले होते व त्याचबरोबर चंद्रकांत कुलकर्णी यांनी श्री हनुमान मंदिरास चांदीचे दागिने भेट दिली त्याबद्दल मंदिर समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यांचा येतोचित्त सत्कार केला. मंदिर समितीच्या वतीने आज पासून पाच दिवस श्री हनुमान पालखीचे दररोज रात्री मंदिरास प्रदक्षिणा घातली जागे, श्री हनुमान जन्मोत्सवच्या पाचव्या दिवशी समितीच्या वतीने प्रतिवर्षी छबिना पालखीचे ग्रामप्रदक्षिणा घालून यात्रेचे सांगता संपन्न होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी आपल्या ज्ञान कौशल्याद्वारे विकसित भारताची मुहूर्तमेढ रोवली - प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे




**जालना** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानसंपादन करून प्रस्थापित समाज व्यवस्थेची चिकित्सा केली. प्रज्ञा, शील, करुणा ही तत्वप्रणाली भारताला आधुनिकतेकडे नेणारी आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आंबेडकरांनी दाखविलेला मार्ग महत्वपूर्ण आहे. भारत समृद्ध व्हावा यासाठी त्यांनी केलेली सैद्धांतिक मांडणी मोलाची आहे. विकसित भारताची फ्रेमवर्क त्यांनी मांडली. चारित्र्य मानवी जीवनाचा महत्त्वाचा पैलू आहे. चारित्र्याचे अध:पतन होऊ देता कामा नये. त्यासाठी प्रज्ञा, शील अतिशय महत्त्वाचे आहे. डॉ.आंबेडकरांची जयंती लोकशाहीचा, तुमचा आमचा, सर्वांचा उत्सव आहे.जयंती साजरी करताना बाबासाहेबांनी दिलेल्या विचाराची जाणीव आपण सातत्याने ठेवली पाहिजे. बाबासाहेबांनी शिक्षणावर म्हणजेच ज्ञानावर प्रेम केल्यामुळे त्यांना जागतिक कीर्ती मिळाली. एवढ्या मोठ्या जल्लोषात जागतिक स्वरूपाचा जयंती उत्सव बाबासाहेबांचा साजरा केला जातो. शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे रोल मॉडेल आहेत असे प्रतिपादन प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे यांनी केले.बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती निमित्ताने ते बोलत होते.यावेळी प्रा. प्रमोद अवचार म्हणाले, डॉ.आंबेडकरांचे कार्य विश्वव्यापी होते. त्यांच्या विचारांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांचे योगदान आपणाला कळणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि शाहू महाराजांचा विचार पुढे नेण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.प्रा. अभिजित भुतेकर म्हणाले की, बाबासाहेबांची लढाई सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी होती. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी साऱ्या समाजाला उन्नतीची संधी उपलब्ध करून दिली आहे. आपल्या राज्यघटनेची सुरुवातच त्यांनी "आम्ही भारताचे लोक" यापासून केली यातूनच त्यांचा विशाल दृष्टिकोन लक्षात येतो.प्रारंभी प्रा.विलास भुतेकर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.यावेळी प्रा.डॉ. सुरेश कागणे, डॉ. कल्याण कुंभार, प्रा.संदीप पाटील,प्रा. योगिता ढेंगळे, प्रा.सचिन चव्हाण, प्रा. अभिषेक ढेंबरे, प्रा. डॉ. रामेश्वरी कमठम, श्री.मिलिंद कुलकर्णी, श्री.विजय लोणकर, ज्योती धांडे, यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थीनी उपस्थित होत्या.यावेळी ग्रंथालयाच्या अभ्यासिकेमध्ये विविध विषयावरील पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी केले.यावेळी यशोदा दिघे आणि ग्रंथपाल डॉ.कल्याण कुंभार यांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ एप्रिल २०२५


## संविधानाने दिलेले अधिकार हिसकावले जात आहेत, प्रणिती शिंदेंचा आरोप



**मुंबई :** केंद्र सरकार असो की, राज्य सरकार ते संविधानाला मानत नाही. संविधानाने दिलेले अधिकार हिसकावून घेतले जात आहेत. आपला देश हळूहळू हिटलरशाहीकडे वळवला जातो आहे, असा आरोप काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांनी आज केला. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रणिती शिंदे यांनी आंबडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी भाजपवर गंभीर आरोप केले.

प्रणिती शिंदे म्हणाल्या की, बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान आणि लोकशाही निर्माण केली आहे. संविधान आपण वाचवले पाहिजे. जेव्हा सत्ताधाऱ्यांचे विचार हे बाबासाहेबांच्या विरोधात आहेत, जेव्हा देशाचे गृहमंत्री म्हणतात की, संविधान संविधान संविधान हे अभी फॅशन बन गया है, जर संविधान आणि बाबासाहेबांचा असा तिरस्कार केला जात असेल, तर ही प्रत्येकाची जबाबदारी आहे की, लोकशाहीची चळवळ जिवंत ठेवली पाहिजे.

भाजपने जेव्हा ४०० पारचा नारा दिला होता, तेव्हा कोणाला माहिती होते की, संविधान बदलण्यासाठी त्यांनी हा नारा दिला होता, पण त्यांचे पितळ उघडे पडले, अशी टीका प्रणिती शिंदे यांनी केली. बाबासाहेबांना मानणारे जोपर्यंत आहेत, तो पर्यंत संविधानाला आम्ही हात काय बोट पण लावू देणार नाही. बाबासाहेब हे केवळ आपल्या देशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी होते ही बाब विसरता येणार नाही, असेही प्रणिती शिंदे म्हणाल्या.

जिथे हिटलरशाही आहे अमेरिका, रशिया किंवा आपला देश. सगळीकडे हिटलरशाही चालू आहे. त्या ठिकाणी बाबासाहेबांचे विचार महत्त्वाचे आहेत. संविधानाने दिलेले अधिकार हिसाकावून घेतले जात आहेत. आचार्य अत्रेचा काळ होता, जिथे प्रत्येक राज्यकर्त्यांचा बाबतीत ते विनोद करायचे. त्यावेळेस त्यांच्यावरती या थराला जाऊन कधी कोणी काहीही केले नाही. पण आता हे व्यासपीठ राहिलेले नाही, जे व्यासपीठ बाबासाहेबांनी दिले ते राहिलेच नाही, असे प्रणिती शिंदे म्हणाल्या.

जेव्हा तीन-तीन वर्ष महानगरपालिकेच्या निवडणूक होत नाहीत त्यातूनच संविधानाचा अपमान होतो. केंद्र सरकार असो की, राज्य सरकार ते संविधानाला मानत नाही. संविधानाने दिलेले अधिकार हिसकावून घेतले जात आहेत. आपला देश हळूहळू हिटलरशाहीकडे वळवला जातो आहे, असा आरोपही प्रणिती शिंदे यांनी केला.

प्रणिती शिंदे यांनी यावेळी शेतकरी कर्जमाफी, संतोष देशमुख हत्या प्रकरण, सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणावरून सरकारवर जोरदार निशाणा साधला. देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफी देऊ म्हटले होते. आता ते म्हणत आहेत सगळी वचने दिली ती पूर्ण केली जात नाहीत. ही फसवणूक आहे, असे त्या म्हणाल्या. बीडमध्ये सरपंचाचा मृत्यू झाला. या संदर्भातला व्हिडीओ समोर आला. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांना हे सगळे माहिती होते तरीही ते हसत खेळत होते. या सरकारला आतला आवाजच उरला नाही. सोमनाथ सूर्यवंशीची हत्या पोलिस कोठडीत झाली आहे. तरीही सरकारने काही केले नाही, असा आरोप प्रणिती शिंदे यांनी सरकारवर केला.

## शांतीदुत परिवारच्या वतीने सेवारत्न पुरस्कार जाहीर



**(मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य केलेल्या मान्यवरांना शांतिदूत परिवार महाराष्ट्रच्या वतीने सेवारत्न पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आले.मान्यवरांच्या हस्ते सोमवारी (ता.२८) रोजी शहरातील ओम लॉन्स येथे विवीध मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळ संपन्न होणार आहे. सेवारत्न पुरस्कार २०२५ साठी उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहियोदिन सुलतान, माजी नगरसेवक विजय दळगडे, महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे सह संचालक डॉ.तुकाराम मोटे,जकेकुरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी, उद्योजक अनिल सगर, सुमित कोथिंबीरे, पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले, मंजुषा चव्हाण, ॲड. दिलीप सगर, एसबीआय शाखा प्रबंधक शितल रासकर, अपर्णा पोद्दार, संजय रूपाजी, सुरेश माणिकवार, अशोक जाधव, किसन राठोड, अजय गायकवाड, शेखर आंबेकर, गोविंदराव गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार सोहळा ओम लॉन्स चौरस्ता येथे संपन्न होणार असून तालुका व परिसरात नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव, प्रा. युसुफ मुल्ला, प्रा. जिवन जाधव, मनेश माणिकवार, पद्माकर मोरे यांनी केले आहे.

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळेत डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती भारद्वाज मॅडम यांनी भुषवले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी स्थान श्री शिंदे सर यांनी भुषवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती माळोदे मॅडम यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त श्रावणी खिल्लारे, नव्या ढाले, तेजस्वी खरात, गीता साळुंखे, आलीना शेख, सायली खिल्लारे, तनवीर शेख, अबरार शेख या विद्यार्थ्यांनी भाषणे तसेच गाणे सादर केले. कार्यक्रमासाठी तारो मॅडम, भिंगोले मॅडम, गणोरीकर मॅडम, संदीप चव्हाण सर, वसंत राठोड सर, सूर्यवंशी सर, पठाडे सर, वाघ सर इत्यादी शिक्षकांची उपस्थिती होती. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साबळे मावशी, खापे मामा यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती भिंगोले मॅडम यांनी केले.

## अब्दीमंडी येथील युवकाला मारहाण युवक जखमी



**दौलताबाद (शिवाजी गायकवाड) :** अब्दीमंडी येथील जाबिर शेख यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे की दिलशान जाकीर शेख वय वय १८ हा त्यांच्या कडे राहतो व त्यांच्या कामात मदत करतो दि १३ रविवारी दिलशान रविवारी सकाळी साडे नऊच्या सुमारास घराकडून दुचाकी वर खोजेवाडी येथील सा मिल वर कामासाठी निघाला व काही वेळा नंतर दुचाकी सोडून जखमी अवस्थेत पळत पळत घराकडे आला तोच त्याचा पाठीमागे गावातील शेहबाज अजीम शेख वय २५ वर्ष,अजीम शब्बीर शेख वय ४५ वर्ष,माजिद शब्बीर शेख वय ३८ वर्ष ,रेहान अजीम शेख वय १९ वर्ष चौघे धावत आले व घरात घुसले मी त्यांना जाब विचारला असता त्यांनी मला शिवीगाळ करत तुमच्या भाच्याला तुमच्या घरात राहू देऊ नका आम्ही त्याचे हातपाय तोडू असे धमकावलेदिलशान याने सांगितले की चौघांनी मिळून लाकडी दांड्याने व दुचाकी च्या शोकअप ने मारहाण करण्यात आली आहेजखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेजाबिर शेख यांच्या फिर्यादी वरून दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये चौघा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले आहे पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक रफिक पठाण हे करत आहे


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ एप्रिल २०२५

# 'नुसतेच बुडबुडे' म्हणजे जीवनातील विविध समस्यांना अंतर्मुख करण्याची किमया - डॉ. भास्कर बडे




**उमरगा, (डॉ. महेश मोटे) :** नुसतेच बुडबुडे हे शीर्षक या काव्यसंग्रहास असले तरी यातील कविता काही क्षणिक फुगणारे बुडबुडे नाहीत, तर त्या मनाच्या तळाशी हलकेच उमटणाऱ्या अर्थपूर्ण लाटा आहेत. अशा लाटा कितीही उमटल्या, तरी त्या प्रत्येक वेळी नव्याने जीवनातील विविध समस्यांना अंतर्मुख करतात हीच या कवितेची खरी किमया असल्याचे प्रतिपादन जेष्ठ कथाकार तथा मराठवाडा साहित्य परिषद, संभाजीनगर चे माजी कोषाध्यक्ष प्रा. डॉ. भास्कर बडे यांनी केले.

उमरगा येथील बहुजन विद्यार्थी वसतिगृहाच्या सभागृहात मराठवाडा साहित्य परिषद, उमरगा शाखेच्या वतीने आयोजित के. पी. बिराजदार लिखित ' नुसतेच बुडबुडे ' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी रविवारी (ता.13) रोजी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रा. किरण सगर होते. यावेळी भाष्यकार म्हणून आदर्श महाविद्यालयाचे प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार, ज्येष्ठ नाट्य लेखक प्रा. हणमंतराव आलुरकर, मुरूमच्या माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महेश मोटे, लातूरचे कथाकार जी. जी. कांबळे, चंद्रकांत भातलोंढे, कविवर्य के. पी. बिराजदार, चित्रलेखा बिराजदार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. बडे म्हणाले की, कविता वाचताना जीवनातील विविध बारकावे, मनातील हलचाली, समाजातील विसंगती आणि अंतर्मनातील संवेदना यांचा अनुभव येतो. नुसतेच बुडबुडे हे शीर्षक जरी हलकंफुलकं वाटत असलं, तरी त्या बुडबुड्यांतून खोल अर्थ प्रकटला आहे. आजच्या तांत्रिक व वेगवान युगात, माणूस आतून थकला आहे, तुटलेला आहे. अशा वेळी कविताही त्याच्या भावविश्वाशी जोडणारी, त्याला उमज देणारी शक्तीच आहे. या संग्रहातील कविता केवळ शब्द म्हणून न पाहता, त्या वाचून अंतर्मनात उतरवाव्यात. यातून निर्माण होणारे विचार, भावना आणि प्रेरणा हीच या कवितांची खरी देणगी असल्याचे शेवटी ते म्हणाले. याप्रसंगी डॉ. महेश मोटे म्हणाले, हा कवितासंग्रह जीवन अनुभव, सामाजिक जाणिवा, ज्वलंत प्रश्न, वास्तवतेचे भान या सगळ्या समस्यांना कवितेच्या माध्यमातून आकार दिला गेला आहे. त्यामुळे हा कवितासंग्रह निश्चितच साहित्य प्रेमी व वाचकांना प्रेरणा, उर्जा व बळ देणारा ठरेल. भाष्यकार डॉ. लक्ष्मण बिराजदार म्हणाले की, नुसतेच बुडबुडे काव्यसंग्रह जगण्यातील वास्तव शब्द रूपाने सांगतो. यामध्ये काही कविता ज्या समाजातील प्रश्नांना भिडतात, तर काही व्यक्तीच्या मनात डोकावतात. वेदना, आनंद, आकांक्षा, विद्रोह, नात्यांची गुंतागुंत या सगळ्यांनी या कवितांना आकार दिला आहे. त्यामुळे नवलेखकांनी नेहमी लिहीत राहणे, वाचत राहणे आणि शब्दांची ही ताकद जपत राहणे महत्त्वाचे आहे.

या प्रसंगी मनोगतात के. पी. बिराजदार म्हणाले की, माझ्या संपूर्ण जीवन प्रवासात माझे कुटुंबीय, साहित्य प्रेमी, वाचकांचा प्रतिसाद, प्रोत्साहन व सहकार्यामुळे मी निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे साहित्य निर्मिती करू शकलो. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्रा. किरण सगर म्हणाले की, एसटी महामंडळातील कंडक्टर ते कविवर्य हा त्यांचा प्रवास निश्चितच साहित्यप्रेमींना प्रेरणादायी आहे. सेवानिवृत्तीनंतर देखील समाजातील ज्वलंत प्रश्न, अन्याय-अत्याचार आणि मानवी भावना यांचे नेमके शब्दांकन या कविता संग्रहात असून माणुसकी, स्नेह, एकटेपणा, विविध समस्या आणि मानवी अस्तित्वाचे प्रश्न यांचा वेध घेणाऱ्या कविता यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नुसतेच बुडबुडे या शीर्षकातूनच आयुष्यातील विविध समस्या आणि विचारांच्या निसटत्या लहरींची जाणीव करून दिली आहे. हा त्यांचा प्रयत्न निश्चितच इतरांना दिशादर्शक ठरेल.

प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या मुख्याध्यापक सुभाष वैरागकर, विज्ञान शिक्षक परमेश्वर सुतार, पत्रकार अविनाश काळे आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक गुंडू दूधभाते यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक सुधीर कांबळे तर आभार मनोजकुमार गुरव यांनी मानले. धम्मचारी प्रज्ञाजीत, प्राचार्य भिमाशंकर सारणे, प्रा. रमेश जकाते, प्रा. डॉ. अवंती सगर, शिला मुदगडे, सरिता उपासे, उषा सगर, रेखा सुर्यवंशी, संतोष सुर्यवंशी, विवेक जाधव, प्रा. विजयकुमार जगताप आदी सह साहित्य प्रेमी, मित्रपरिवार व बिराजदार आप्तस्वकीय बहुसंख्येने उपस्थित होते.

# संविधान धोक्यात आहे...!



इथून तिथून सगळीकडं
हे सारं असं तसंच चालू आहे
संविधानाचा सन्मान करणारे
आजकाल देशद्रोही
अन् नक्षली ठरवले जाताहेत

संविधानाच्या अन् समतेच्या
रोज गर्जुन बाथा केल्या जातात
संविधानाची पायमल्ली करणाऱ्यांवर
कारवाईबाबत बहाणे सांगितले जातात

संविधानाची शपथ घेणारे
जवळ जवळ चारसो बीस आहेत
त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा काय ?
जजही आजकाल विकले जाताहेत

संविधान नाकारता येणारे नाही
त्यात संपूर्ण मानवी कल्याण आहे
संविधान पुजनीय नाही
ते आचरणीय आहे

आमचा इतिहास हा विषमतेचा
समतेचा अन् त्यांचा काय संबंध ?
संविधान सर्व जाती धर्मांच्या कल्याणासाठी
नेमकं हेच जातीयवाद्यांना खपत नाही

आजही बहुतांशी शासनकर्ते
संविधानाच्या विरोधी वागतात
तक्रार केलीच त्यांची
तर सरकारकडून त्यांना पुरस्कार मिळतात

संविधानाचं रक्षण करणारेच
रोज काहीही बरळतात
शेतच कुंपण खात आहे
त्यांच्याकडून रक्षणाची काय अपेक्षा ?

हिंदुत्वाने लोकांची माथी भडकली जातात
सर्वधर्मसमभाव तत्वाला तडा देतात
आम्हीच संविधानाचे वाली
उगीच खोटा आव आणतात

ज्यांनी जात,धर्म,भगवानचा जप केला
त्यांना स्वर्ग कधी नाही मिळाला
ज्यांनी ज्यांनी नरक यातना भोगल्या
आंबेडकरी विचारांने त्यांच्या जीवनाचे सोने झाले

समस्त आंबेडकरी अनुयायांनो
अन् संबंध भारतवासीयांनो
तुमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे
जागो, संविधान धोक्यात आहे.

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**मो.9423397484**

# लग्नाचे दागिने घेऊन मुलगी बेपत्ता



**दौलताबाद (शिवाजी गायकवाड) :** रंजना विजय घोडके वय ४० राहणार करोडी टोल नाक्याजवळ तालुका छत्रपती संभाजीनगर यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे की त्यांची मुलगी वैष्णवी विजय घोडके वय १८ वर्ष ही ११ एप्रिल दुपारी दोन वाजेच्या सुमारास कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेली आहे तिने तिच्या सोबत तिच्या लग्नासाठी आई ने तयार केलेली सोने चांदी चे दागिने सोन्याचे कानातले, मंगळसूत्र, कानातील कुडुक व हुजूर, नाकातील नथ, पायातील पैंजन, पायातील जोडे असे घरातील दागिने सोबत घेऊन गेली. तिचे वर्णन अंगात पंजाबी ड्रेस, वर टॉप, पायात सँडल, नाक दबके, रंग गोरा, चेहरा लांबट, बाधा सळपटल, कपाळावर गोंडलेले आहे. माहिती मिळण्यास दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अंमलदार बी. एल. अहिरे यांच्याशी संपर्क साधावा

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002